नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ३१/०८/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

## अकस्मात मृत्यु

१) पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत ३३ कि. मी. अंतरावरील मौजा सांवगी शिवार कन्हार नाला येथे दिनांक २९/०८/२०२२ चे २०.०० वा. ते दिनांक ३०/०८/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास **गोमा फत्तुजी ईळपाची वय ४५ वर्ष रा सांवगी (ढवळापुर)** हा बंडु खंडाते व संजय कोरचाम यांचे सोबत एमएच— ४०/एवी— ७५४६ क्रमांकाच्या मोटरसायकलने कामावरून गावात परत येत होता. त्यादरम्यान तिघेही मोटरसासकल सह सावंगी कन्हार नाल्याच्या पाण्यातुन वाहुन गेले होते. दोघेजण पाण्याच्या बाहेर निघाले व मृतक हा पाण्यात वाहुन गेला व त्याचे प्रेत दि. ३०/०८/२०२२ रोजी मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गणेश नथ्थुजी ईळपाची, वय ४२ वर्ष, सावंगी (ढवळापुर) यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारश्विनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास गंगाप्रसाद वरकडे मो.क्र. ९७६३२१५४६५ हे करीत आहेत.

२) पो.स्टे. कळमेश्वर :— अंर्तगत १४ कि. मी. अंतरावरील मौजा गोंडखैरी शिवार, अमरावती ते नागपुर रोडनी चोखाधानी हॉटेल जवळ येथे फिर्यादी नामे— पोचुल बाबुराव शिंदे, वय २८ वर्ष रा. गंगानगर काटोल रोड नागपुर हे त्यांची पत्नी नामे— **प्रिती पोचुल शिंदे (मृतक), वय २२ वर्ष, रा. गंगानगर काटोल रोड नागपुर** हिला आपले एमएच— ३१/बी आर— ४६७४ क्रमांकाच्या मोटरसायकलवर मागे बसुन गोंडखैरी वरून आपले गावी अमरावती नागपुर रोडनी जात होते. त्यादरम्यान चोखरधानी हॉटेल समोर चालत्या मोटारसायकलचे गाडीच्या मागच्या चाकात तिचा साडीचा पदर नजर चुकीने अडकल्याने ती गाडी वरून खाली पडली. त्यामुळे तिच्या डोक्याला मार लागुन ती जखमी झाल्याने तिला उपचारकामी प्रायव्हेट हॉस्पीटल नागपुर व तेथुन मेडीकल कॉलेज नागपुर ट्रामा येथे दि. २९/०८/२२ रोजी भरती करण्यात आले. उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तिला तपासुन दि. ३०/०८/२०२२ चे सकाळी ०८.५२ वा. मृत घोषीत केले. अशी मर्ग सुचना प्राप्त झाल्याने अशा सुचनेवरून सदरचा मर्ग दाखल केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि मोरेश्वर नागपुरे मो.नं. ८८८८८२१३६० हे करीत आहेत.

**३) पो.स्टे. कन्हान** :- अंर्तगत मौजा धरम नगर, कन्हान येथे दि. ०८/०८/२२ चे ०८.३० वा. चे सुमारास **धनुष्य लक्ष्मण पाटील वय ३० वर्ष, रा. धरम नगर, कन्हान** याने दारू पिवून नशेत बाहेरून कुठलेतरी विषारी औषध प्राशन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्याला उपचारासाठी प्रथम खाजगी दवाखाना कन्हान व नंतर सरकारी दवाखाना कामठी त्यानंतर नागपूर मेडीकल कॉलेज नागपूर येथे दि. १०/०८/२२ ला भरती केले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तपासून दि. २८/०८/२२ रोजी मृत घोषीत केले. दि. ३०/०८/२२ रोजी सदर मर्ग चे कागदपत्रे टपालव्दारे प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा राजेश माकडे, मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोना राजेन्द्र गौतम मो.क्र. ८८३०५३२५६१ हे करीत आहेत.

## सर्पदंशामुळे मृत्यु

**पो.स्टे. बेला** :- अंतर्गत तामसवाडी आष्टा त.जि.नागपुर येथे दिनांक २९/०८/२०२२ चे ०८.०० वा. दरम्यान **कु. मंगला नारायण वाघमारे(मृतक) वय २६ वर्ष, रा. तामसवाडी आष्टा त.जि.नागपुर** ही आपल्या घराचे जवळील बैलाच्या कोठयाजवळ गेली असता तिला डाव्या पायाचे अंगठयाजवळ विषारी सापाने चावा घेतला. तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचाराकामी प्राथमीक आरोग्य केंद्र बेला येथे नेले व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. सदर मर्ग मेडीकल सुचनेवरून नोंद घेउन मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा राजेश माकडे, मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बेला येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार अजय चौधरी मो.न. ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**